MHNG100009942014

नियमीत दरखास्त क्र. ३०/२०१४
चंदुलाल – विरुध्द – गंगाराम

## निशाणी क्र. ३९ व ४२ ते ४५ वर आदेश
## (पारित दिनांक २९.०३.२०२५)

धनको यांचा अर्ज तसेच अभिलेखाचे अवलोकन करुन धनको यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

अर्ज :

२. प्रस्तुतचे दोन्ही अर्ज धनको यांनी शेत जमिनीचा कब्जा मिळण्यासाठी ताबा अधिपत्र निर्गमीत करणेसाठी दाखल करण्यात आलेला आहे. धनको यांचे थोडक्यात कथन की, प्रतिवादी यांच्या कब्जात शेत आहे. ते धनको यांना घेणे आहे. सबब, त्यांच्याविरुध्द कब्जा अधिपत्रक निर्गमीत करावे अशी त्यांनी विनंती केली.

खुलासा :

३. ऋणको यांनी त्यांना संधी असून सुध्दा त्यांनी खुलासा दाखल कला नाही.

४. युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. दरखास्त ही हुकूमनाम्याच्या समाधानासाठी दाखल करण्यात आली आहे. हुकूमनामा हा नि.दि.दा.क्र. १०६/२००७ चा आहे. ऋणको यांनी मा. जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले होते. सदरचे अपील हे मा. जिल्हा न्यायालयाने फेटाळल्याचे अभिलेखावरून दिसून येते. तसेच मा. उच्च न्यायालयात देखील अपील दाखल करण्यात आले होते. सदरचे अपील देखील मा. उच्च न्यायालयाने फेटाळल्याचे दिसून येते.

५. या पुर्वी नि.क्र. १७ अन्वये ऋणको विरुध्द ताबा अधिपत्रक निर्गमीत करण्यात आले होते, असे दिसून येते. त्याबाबतचा अहवाल हा अभिलेखावर दि.०७–०३–२०१९ रोजी दाखल आहे. अभिलेखावर नि.क्र. २३ अन्वये अर्ज दाखल आहे. सदरचा अर्ज

न्यायालयाने दि. २८–०३–२०१९ रोजी गुणवत्तेवर निकाली काढल्याचे दिसून येते. त्यानंतर नि.क्र. २६ अन्वये धनको यांनी अर्ज दाखल केला आहे. न्यायालयाने सदरचा अर्ज मंजुर केल्याचे दिसून येते. त्यानंतर नि.क्र. ३९ अन्वये ताबा अधीपत्रक मिळणेसाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर पुन्हा नि.क्र. ४२ अन्वये अर्ज दाखल करण्यात आला. त्यासोबत नि.क्र. ४४ अन्वये बेलीफ भत्ता न्यायालयात अदा करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला व नि.क्र. ४५ अन्व्ये पोलीस मदत मिळण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला.

**६.** प्रकरण प्रलंबीत असतांना, मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

**७.** न्यायालयाने ऋणको यांचे सर्व मुद्दे गुणवत्तेवर निकाली काढलेले आहेत. या आधीच माझे सन्मानीय पुर्वाधिकारी यांनी नि.क्र. १७ अन्वये कब्जा अधिपत्र निर्गमीत केले होते. या ठिकाणी धनको यांचेतर्फे नि.क्र. २६ अन्वये दाखल अर्जात त्यांनी कब्जा मिळणेकामी पोलीस संरक्षण मिळणेसाठी अर्ज दाखल केला होता. त्या अनुषंगाने अधिपत्र हे निर्गमीत करण्यात येऊन पोलीस संरक्षण देखील पुरविण्यात आले होते.

८. अभिलेखावरुन असे दिसून येते की, यापुर्वी न्यायालयने ताबा अधिपत्र निर्गमीत केले होते, परंतु ऋणको यांनी धनको यांना ताबा देण्यास हरकत अडथळ केला होता, त्यामुळे धनको यांनी पुन्हा त्याच आशयाचा प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. त्यासाठी धनको हे त्याबाबतचा पोलीस भत्ता भरण्यास पुन्हा तयार आहे. त्यामुळे हुकूमनाम्याच्या समाधानासाठी पुन्हा आदेश पारित करणे मला न्यायोचित वाटते आणि म्हणून नि.क्र. ३९ व ४२ ते ४५ वरील अर्ज हे मंजुर होणेस पात्र आहे, असे मी माझे मत नोंदवितो. सबब अभिलेखावरील एकंदरीत विवेचनावरून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: आदेश :**

- धनको यांचे नि.क्र. ३९ व ४२ ते ४५ वरील अर्ज हे मंजुर करण्यात येत आहे.
- दिवाणी प्रक्रीया संहितेचे आदेश २१ नियम ३५ अन्वये हुकूमनाम्याचे समाधान किंवा अनुपालन होणेसाठी पुन्हा नव्याने ताबा अधिपत्र निर्गमीत करण्यात यावे.
- दिवाणी प्रक्रीया संहितेचे आदेश २१ नियम ३५ अन्वये संबंधीत बेलिफ कर्मचारी यांनी त्यांना असलेल्या अधिकारीतेचा वापर करुन कब्जा धनको यांना द्यावा.
- धनको यांना आवश्यक तो खर्च व भत्ता भरण्यास परवानगी देण्यात येते.
- तसेच पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन बुट्टीबोरी, यांना निर्देश देण्यात येते की, धनको यांना हुकुमनाम्याचे समाधान होणेसाठी किंवा वाद मिळकतीमध्ये ताबा मिळणेस आवश्यक ते महिला व पुरुष पोलीसांचे संरक्षण हे आवश्यक ते शुल्क नियमाप्रमाणे आकारुन पुरविण्यात यावे.
- धनको यांना वाद मिळकतीचा ताबा आहे त्या परिस्थतीत म्हणजेच त्यामध्ये जे पिके असतील, त्यासह देण्यात यावा.

उमरेड. **(रा.भा. डोळे)**

दिनांक : २९.०३.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड

**: प्रमाणपत्र :**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : – आर.ए.देशकर

न्यायालयाचे नांव : – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उमरेड

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक : – २९.०३.२०२५.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३